भुयारी मेट्रो ३ चे काम वेगात : वरिष्ठांनी घेतला कामाचा आढावा; मुंबईकरांच्या सेवेत दाखल होण्याची प्रतीक्षा

# मुंबईच्या पोटातून जाणाऱ्या मेट्रो ट्रेनची चाचणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो - ३ चे काम वेगाने सुरू असून, आता या कामात आणखी एक मैलाचा दगड रोवला गेला आहे. आंध्र प्रदेश येथील श्री सिटीमध्ये जेथे मेट्रोचे कोच तयार केले जातात तेथे मेट्रो - ३ साठीच्या पहिल्या मेट्रोची टेस्ट ट्रायल होत असून, याच कारखान्याला मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देत मेट्रोच्या कामाचा आढावा घेतला.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून मुंबई महानगरात मेट्रोचे जाळे उभे केले जात आहे. कॉर्पोरेशनकडून भुयारी मेट्रो - ३ बांधली जात असून, उर्वरित मेट्रो प्राधिकरणाकडून उभारल्या जात आहेत. यापैकी मेट्रो - २ अ आणि मेट्रो - ७ चे काम वेगाने सुरू असले तरीदेखील कोरोनामुळे किंचित का होईना या दोन्ही मेट्रो रुळावर येण्यास विलंब झाला आहे. दुसरीकडे भुयारी मेट्रो - ३ चे काम मात्र वेगाने सुरू असून, भुयारी काम बऱ्यापैकी पूर्ण झाले आहे. स्थानकांच्या कामांसह विद्युतीकरण व इतर कामांचादेखील धडाका सुरू असून, सरकत्या जिन्यांच्या कामांदेखील वेग आला आहे.




## कुलाबा - वांद्रे - सीप्झ

कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रो ३ च्या डब्यांची मरोळ मरोशी येथे चाचणी करण्यात येणार असून, ट्रेन मुंबईत दाखल होताच चाचण्यांना सुरुवात होणार आहे. तात्पुरती सेवा उभारण्यासाठी शासनाने दिलेल्या परवानगीमुळे प्रकल्पास अधिक चालना मिळेल. आरेतील शासनाने स्थगिती दिलेल्या त्या जागेच्या हद्दीबाहेरच ही चाचणी करण्यात येणार आहे. आरेतील एकाही वृक्षाला धक्का न लागू देता मेट्रोच्या चाचण्या पूर्ण करण्याची सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. चाचणीच्या कामाकरिता झाड तोडण्यात येणार नाही.

## ३१ ट्रेन उपलब्ध

- अल्स्टॉम या कंपनीने श्री सिटी आंध्र प्रदेश येथे ८ डब्यांची ट्रेन तयार केली.
- गाडीची त्या ठिकाणी तांत्रिक चाचणी होत आहे. आंता प्रत्यक्षात चाचणी मुंबईत १० हजार किमी चालवून घेण्यात येणार आहे.
- त्यानंतर कुलाबा ते सीप्झ या मार्गिकेवर ट्रेन चालविण्यात येणार आहे.
- चाचण्या यशस्वी झाल्यानंतर ३१ ट्रेन धावण्याकरिता उपलब्ध होतील.



## स्थानकांच्या कामाचा आढावा

(आकडे टक्क्यांत)

| | |
|---|---|
| कफपरेड | ८३ |
| विधान भवन | ८४ |
| चर्चगेट | ८२ |
| हुतात्मा चौक | ८२ |
| सीएसएमटी | ७९ |
| काळबादेवी | ३० |
| गिरगाव | ३० |
| ग्रँट रोड | ४३ |
| मुंबई सेंट्रल | ८० |
| महालक्ष्मी | ७८ |
| सायन्स म्युझियम | ७४ |
| आचार्य अत्रे चौक | ५० |
| वरळी | ७४ |
| सिद्धिविनायक | ८१ |
| दादर | ७२ |
| शितळादेवी | ६० |
| धारावी | ७७ |
| बीकेसी | ७५ |
| विद्यानगरी | ७७ |
| सांताक्रुझ | ७८ |
| राष्ट्रीय विमानतळ | ७८ |
| सहार रोड | ७८ |
| आंतरराष्ट्रीय विमानतळ | ७९ |
| मरोळ नाका | ८३ |
| एमआयडीसी | ८७ |
| सीप्झ | ८५ |

# मेट्रो २ अ, मेट्रो ७ नव्या वर्षात धावणार !

### आयुक्तांकडून पाहणी : पश्चिम उपनगरातील प्रवास वेगवान

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने मुंबईच्या पश्चिम उपनगरात मेट्रो - २ अ आणि मेट्रो - ७ चे काम करण्यात येत असून, या दोन्ही मेट्रो नव्या वर्षांत म्हणजे जानेवारी - फेब्रुवारी २०२२ मध्ये रुळावर येणार आहेत. मेट्रो २ अ ही (यलो लाइन) तर मेट्रो - ७ ही (रेड लाइन) म्हणून ओळखली जात असून, या दोन्ही मेट्रो रुळावर आल्यानंतर पश्चिम उपनगरात वास्तव्य करत असलेल्या नागरिकांचा प्रवास वेगवान होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राप्त माहितीनुसार, मेट्रो २ अ ही दहिसर पूर्व ते डी.एन. नगर या मार्गावर तर मेट्रो - ७ ही दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व अशी धावणार आहे. मेट्रो - २ अ १८.५ किलोमीटर लांब असून, मेट्रो - ७ ही १६.४ किलोमीटर लांब आहे. दरम्यान, येथील मेट्रो डिसेंबर २०१९ पर्यंत सुरू होणार होत्या. परंतु प्रकल्प उभा करताना अनेक अडचणी आल्या. मात्र आता वेगाने कामे सुरू आहे.

## मेट्रो २ - अ

**कॉरिडोर :** दहिसर पूर्व ते डी.एन. नगर

**लांबी :** १८.५ कि.मी

**आगार :** चारकोप

**एकूण स्थानके :** अंधेरी (पश्चिम), लोअर ओशिवरा, ओशिवरा, गोरेगाव (पश्चिम), पहाडी गोरेगाव, लोअर मालाड, मालाड (पश्चिम), वळनाई, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), पहाडी एक्सर, बोरिवली (पश्चिम), एक्सर, मंडपेश्वर, कंदरपाडा, अप्पर दहिसर आणि दहिसर (पूर्व)

## मेट्रो - ७

**कॉरिडोर :** दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व

**लांबी :** १६.४ कि.मी

**आगार :** चारकोप

**एकूण स्थानके :** गुंदवली, मोगरा, जोगेश्वरी (पूर्व), गोरेगाव (पूर्व), आरे, दिंडोशी, कुरार, आकुर्ली, पोईसर, मागठाणे, देवीपाडा, राष्ट्रीय उद्योग आणि ओवरीपाडा

पश्चिम उपनगरात सुरू असलेल्या मेट्रो कामांची आयुक्तांकडून सातत्याने पाहणी सुरू असून, येथील कर्मचाऱ्यांना पुरेसे प्रशिक्षण दिले जात आहे.

## प्रवास भाडे परवडणारे

- मेट्रो २ - अ दहिसर पूर्व ते डी.एन. नगर अशी आहे. दहिसर येथे मार्ग ७, शास्त्री नगर येथे ६, डी.एन. नगर येथे मार्ग ७ सोबत जोडला जाईल.
- मेट्रो ७ अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व हा पश्चिम द्रुतगती मार्गाच्या बाजूने जाईल. हा मार्ग अंधेरी येथे मार्ग १, जोगेश्वरी जेव्हीएलआ येथे मार्ग ६ आणि दहिसर येथे मार्ग २ अ सोबत
- मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ मुळे दरवर्षी सुमारे २ लाख ५० हजार टन कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनात घट होईल.
- मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ मधून सुरुवातीला दररोज ९ लाख प्रवास करतील.
- मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ सुरु झाल्यानंतर अंधेरी ते दहिसर पट्ट्यातील १३ लाख प्रवाशांना सेवा देण्यात येणार आहे.
- भाडे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे असेल.